RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ५, अंक ६४]  गुरुवार, नोव्हेंबर ७, २०१९/कार्तिक १६, शके १९४१  [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

### असाधारण क्रमांक १२६

### प्राधिकृत प्रकाशन

**उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, रायगड यांजकडून**

**शुद्धिपत्र**

क्रमांक उविअ/एसआर-७०/विस्तारित शहापूर/शुद्धिपत्रक.—ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ ज्या क्षेत्रात लागू करण्यात आले आहे व त्या सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या जमिनी समाविष्ट आहेत.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे. त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संपादन करण्यास अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे आयडीसी/१८९२ (१७४४१)/उद्योग-१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे आयडीसी/२०१९/प्र.क्र.४५५/उद्योग-१४, दिनांक ११ सप्टेंबर २०१९ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलमे ३२, ३६ व ३८ चे अधिकार आणि नियमाचे कलम २ (क) अन्वये उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, जि. रायगड यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीत वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, जि. रायगड यांचे मत झाले आहे.

उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभागीय अलिबाग, जि. रायगड यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (२) ची अधिसूचना क्र.उविअ/एसआर७०/विस्तारित शहापूर, दिनांक २ नोव्हेंबर २०१९ अन्वये घोषित केली आहे. सदर अधिसूचना

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक, दिनांक २ नोव्हेंबर २०१९, पृष्ठ १ ते ११४ वर प्रसिद्ध झाली आहे. या अधिसूचनेमधील प्रसिद्ध केलेल्या परिच्छेद सात मधील मजकुरामधील बदल खालीलप्रमाणे वाचावा :—

**जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, गाव शहापूर**

**ऐवजी**

या नोटिशीचे तारखेनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीशिवाय विक्री करून, पट्ट्याने देऊन, गहाण ठेवून, अभिहस्तांकन करून आणि अदलाबदल करून किंवा अन्य रितीने करावयाच्या उक्त जमिनीच्या/जमिनीच्या विल्हेवाटीसंबंधी केलेला कोणताही करार किंवा तीवर केलेला कोणताही खर्च किंवा ती मध्ये/त्यामध्ये केलेल्या सुधारणा या उक्त जमिनीच्या अंतिमतः संपादन करण्यात येतील अशा भागासंबंधी भरपाई निर्धारित करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोट-कलम (५) व भूमी संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा एक) याच्या कलम २४ (सातव्यांदा) अन्वये विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**वाचावे**

या नोटिशीचे तारखेनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीशिवाय विक्री करून, पट्ट्याने देऊन, गहाण ठेऊन, अभिहस्तांकन करून आणि अदलाबदल करून किंवा अन्य रितीने करावयाच्या उक्त जमिनीच्या/जमिनीच्या विल्हेवाटीसंबंधी केलेला कोणताही करार किंवा तीवर केलेला कोणताही खर्च किंवा ती मध्ये/त्यामध्ये केलेल्या सुधारणा या उक्त जमिनीच्या अंतिमतः संपादन करण्यात येतील अशा भागासंबंधी भरपाई निर्धारित करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोट-कलम (५) व **भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ११ (४) अन्वये** विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**शारदा पोवार,**
उपविभागीय अधिकारी,
अलिबाग, उपविभाग अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ६ नोव्हेंबर २०१९.

## BY THE SUB-DIVISIONAL OFFICER, ALIBAG, SUB-DIVISION ALIBAG, RAIGAD

*CORRIGENDUM*

No. SDO/SR-70/Vistarit Shahapur.—Whereas Chapter 6 of the above Act includes the areas in which the application is made and the land mentioned in the Annexure.

And wherever, IDC/1892 (17441) / Industries-14 of the Government of Maharashtra, Industries, Energy and Labour Department, dated 11th September 2019, as per the authority conferred on IDC/2019/ No. 455/Industries of the Government of Maharashtra-14, Day Rule 28 of the Industrial Development Act, 1962 under September 11, 2019, the powers of sections 32, 36 and 38 of the aforesaid rule and under section 2 (*c*) of the rule, Sub-Divisional Officer, Alibag, Sub-Division Alibaug, Dist. Raigad has been given the right to execute.

And wherever it is necessary to acquire land for the Shahapur Industrial Area, an extension of the Shahapur Industrial Area, Maharashtra Industrial Development Corporation, to the corporation of the area mentioned in the accompanying Appendix, Sub-Divisional Officer, Alibaug, Sub-Division Alibaug. Raigad thinks so.

Sub-Divisional Officer, Alibaug, Sub-Division Alibaug, Dist. Raigad Notification No.UVI / SR70 / Extension of Shahapur, Dt. Announced on 2nd November 2019. This Notification *Maharashtra Government Gazette*, Part One, dated November 2, 2019, Page No. 1 to 114 has been released. S.No. Read the changes as follows.

Dist. Raigad, Tal. Alibaug, Village Shahapur

*Instead of*

Any contract for disposal of the said lands by sale, lease, mortage, assignment, exchange or otherwise or any outlay or improvement made therein without the sanction of the Collector after the date of this notice will under sub-section (*5*) of section 33 of the said Act, read with section 24 (seventhly) of the land Acquisition Act, 1984 (I of 1894) be discharged by the officer assessing compensation for such parts of the said land as may be finally acquired.

*Read As*

Any contract for disposal of the said lands by sale, lease, mortage, assignment, exchange or otherwise or any outlay or improvement made therein without the sanction of the Collector after the date of this notice will under sub-section (*5*) of section 33 of the said Act, read with section 11(*4*) of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 be discharged by the officer assessing compensation for such parts of the said land as may be finally acquired.

Alibag,
dated 6th November 2019.

SHARADA POWAR,
Sub-Divisional Officer, Alibag,
Sub-Division Alibag, Raigad.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.